

# छत्रपती शिवाजी महाराज : साहित्यातील प्रतिमा आणि इतिहास

- प्रा. डॉ. गणेश मालटे
श्री शिवाजी विज्ञान कला महाविद्यालय,
चिखली, जि. बुलडाणा

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत, तसेच कलावंतांच्या स्फूर्तीचे स्रोत आहेत शिवाजी महाराजांच्या जीवनावर अनेक अजरामर कृती, केवळ मराठीतच नव्हे, तर इतरही भाषांत प्रकाशित झाल्या आहेत. फक्त शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारलेली ६० पेक्षा अधिक पुस्तके आहेत. यातील बहुतांश पुस्तके संशोधनपर असल्याने त्यांना संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता आहे, तसेच हजारो कथा, ललित कथा, स्तुतिपर लिखाणही प्रकाशित होत असते. शिवाजी महाराजांवर त्यांच्या हयातीत जसे लिखाण झाले तसे ते त्यांच्या निर्वाणानंतरही होत आहे.

मराठी साहित्यात कवितेचे दालन अतिशय समृद्ध आहे. महानुभाव संत ज्ञानेश्वरांपासून ते आजच्या समकालीन कवितेपर्यंत कवितेचा इतिहास पाहिला, तर मराठी साहित्यातील समृद्धता आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. इंग्रज आमदानीत परकीय प्रभाव सन्मुख झालेल्या मराठी कवींना सॉनेटपासून हायकूपर्यंत कशाचेच वावडे मानले नाही. ओवी, अभंग, लावणी आणि पोवाडा हे अस्सल मराठी छंद मानले जातात. चारही छंदांनी मरठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यापैकी पोवाडा हा महत्त्वपूर्ण साहित्यातील प्रकार आहे. 'महाराष्ट्र शब्दकोश'कारांच्या आधारे प / पोवाद म्हणजे "वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याचे सामर्थ्य, गुण, कौशल्य यांचे काव्यात्मक वर्णन, प्रशस्ती, स्तुती स्तोत्र"[1] 'पोवाडा' या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ पराक्रमाचे काव्यात्मक वर्णन असा असला तरी अशाप्रकारचे वर्णन करणारा एक काव्यप्रकार होय. पोवाडा रचणाऱ्या कवीला शाहीर म्हटले जाते. बरेच शाहीर स्वतः रचलेला पोवाडा स्वतः गातातही.

शिवाजी महाराजांच्या कार्याने प्रेरित होऊन महात्मा जोतिबा फुले यांनी 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' हे दीर्घकाव्य लिहिले. "शिवरायांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या म्हणजे इ. स. १६३० ते १६८० या कालखंडातील महत्त्वाच्या प्रसंगांची- पराक्रमांची नोंद या चरित्रात्मक काव्याद्वारे सीमित शब्दांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न शाहीर जोतिबा फुले यांनी केला आहे ही जीवनकथा पोवाड्याच्या आठ भागांतून कथन करण्याची त्यांची आगळीच शैली प्रत्ययास येते.

*कुळवाडी भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।*
*छत्रपती शिवाजीचा ॥*

हे वर्णन शिवरायांच्या सुंदर बालरूपाचे दर्शन घडविते."[२] त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय कार्याचा गौरव महात्मा जोतिबा फुले यांनी घडविला आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी छत्रपती शिवरायांचे चरित्र रेखाटताना त्यांचे बालपण, शिक्षण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, स्वराज्यनिर्मितीसाठी केलेले अथक प्रयत्न, राज्याभिषेक आणि निर्वाण, असा जीवनपट अत्यंत कल्पकतेने काव्यबद्ध केला आहे. "शिवरायांच्या पराक्रमाची ही गाथा, त्यांचे प्रेरणादायी चरित्र, त्यांचे स्फूर्तिदायी कर्तृत्व या देशातील मूळनिवासी बहुजन समाजासमोर आणण्याचे महत्कार्य १४७ वर्षांपूर्वी या पवाड्याच्या माध्यमातून केले."[3] पोवाड्याच्या माध्यमातून शिवरायांच्या पराक्रमांची गाथा, त्यांचे प्रेरणादायी विचार आणि स्वराज्यनिर्मितीच्या यशाची माहिती महात्मा

जोतिबा फुले यांनी रेखाटली आहे

"महात्मा फुलेंनंतर बाबासाहेब पुरंदरे, रणजित देसाई, आदी साहित्यिकांनी विविधांगीसाहित्यकृतींची निर्मिती केली आहे. या कलावंतांचा शिवाजी जसा वेगवेगळा आहे तद्वतच म. फुल्यांच्या पोवाड्यातील शिवाजी खास म. फुल्यांचा असा वैशिष्ट्यपूर्ण शिवाजी आहे. त्यांच्याकडे पाहण्याची फुल्यांची स्वतंत्र आणि विशिष्ट अशी दृष्टी आहे. पोवाड्याच्या आधी आलेल्या अभंगातून ती व्यक्त होते.

*अति महारथी क्षत्रियाचा बाळ। यवनाचा काळ त्रेतायुगी।*
*स्वभावेतो शूर रणीं भीडणार। लढे अनिवार देशासाठी॥*

पोवाड्याची सुरुवात करताना डफावर थाप पडावी तसे त्यांचे शब्द कडाडतात. अर्वाचीन मराठी साहित्यात शिवछत्रपतींचे पराक्रम व कर्तृत्व यांकडे प्रथम लक्ष वेधण्याचे श्रेय जोतीरावांच्या ह्या पोवाड्याला आहे."[4]

म. फुलेंनंतर महादेव मोरेश्वर कुंटे यांनी 'राजा शिवाजी' हे खंडकाव्य लिहिले. कवी यशवंत यांनी 'शिवराय' हे खंडकाव्य लिहिले, तर ह. ना. आपटे यांनी शिवचरित्रावर आधारित 'उष:काल' व 'गड आला पण सिंह गेला' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. रणजित देसाई यांची 'श्रीमानयोगी'

श्रीकांत देशमुख यांची 'कुळवाडीभूषण शिवराय' तर 'छत्रपती शिवरायांचे कष्टकरी मावळे' या दत्ता नलावडे यांच्या पुस्तकातून छत्रपती शिवरायांचा जाज्ज्वल्य इतिहास प्रभावीपणे मांडला आहे.

महाकवी वामनदादा कर्डक यांनी असंख्य बुद्धभीम गीते लिहिली आहेत. त्यांनी आपल्या काव्यातून शिवाजी महाराजांच्या काळातील समाजजीवनाचे यथार्थ चित्रण केले आहे. वामनदादा म्हणतात,

*"शिवरायांच्या छायेखाली कधीच नव्हती वाण...*
*आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान*
*काळ्यारात्री तळपत होतं जिच्या रूपाचं ऊन,*
*अशी देखणी होती एका सुभेदाराची सून...*
*त्या तरुणीला आई म्हणाला राजा तो शीलवान"*[5]

अशा शीलवान राजांचे चरित्र वामनदादांनी आपल्या कवितेतून रेखाटले आहे. आज छत्रपतींचे नाव घेऊन हिंदू-मुस्लीम समाजात भांडणे लावून दंगे भडकावले जाताहेत. मात्र, खऱ्याअर्थाने ते जनतेचे जनसामान्यांचे राजे होते. समाजातील सर्व घटकांना समान न्यायतत्त्व हा विचार छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातल्या सामान्य माणसाच्या मनामध्ये पेरला होता.

*"बांधीत होता मस्जिद इथे अन् तेथे मंदिर*
*त्या शिवाच्या चरणी झुकते सदैव माझे शीर...*
*अशा नराच्या पुतळ्यापाशी अजून झुकते मान."*[6]

असा जाती, धर्मांची बंधने झुगारून सामाजिक समता प्रस्थापित करणारा माझा शिवबा माणुसकीची खाण होता, असे वामनदादा कर्डक म्हणतात.

लोणार येथील इतिहासाचे प्राध्यापक आ. लिं. सोडणर यांनी 'छत्रपती शिवरायांची गीतात्मक शौर्यगाथा' या पुस्तकातून शिवरायांचा इतिहास काव्यरूपाने मांडला आहे. शिवरायांचे गुणगान करताना प्रा. सोडणर म्हणतात,

*"शिवरायांचे धैर्य, शिवरायांचे शौर्य, शिवरायांची युद्धनिती।*
*गनिमी कावा करून शिवरायांनी आखली आपली नीती॥"*[7]

आपल्या मावळ्यांच्या सोबतीने शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. ते स्वराज्य म्हणजे काय? हे सांगताना कवी प्रभुदास बलक म्हणतात,

*"काय होते स्वराज्य*
*नव्हे नुसता सिंहासनाचा थाट*
*ती जनकल्याणाची वाट*
*तीच क्रांतीची पहाट"*[8]

अशाप्रकारे म. फुलेंपासून तर प्रभुदास बलकपर्यंतच्या साहित्यिकांच्या साहित्याचे अवलोकन केले असता या साहित्यिकांनी छत्रपती शिवरायांचे चरित्र, त्यांचे कर्तृत्व, पराक्रम, युद्धनीती अशा विविध पैलूंवर लिखाण केले आहे.

चरित्र, पोवाडे, कथा, कादंबरी, कविता अशा विविध साहित्यप्रकारांतून लेखन करताना छत्रपती शिवरायांप्रती असलेला लोकमनातील आदर या साहित्यातून अभिव्यक्त झाला आहे.

**निष्कर्ष -**

१) छत्रपती शिवरायांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व विविध साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीतून मांडले आहे

२) या साहित्यिकांच्या साहित्याचे अवलोकन केले असता या साहित्यिकांनी छत्रपती शिवरायांचे चरित्र, त्यांचे कर्तृत्व, पराक्रम, युद्धनीती अशा विविध पैलूंवर लिखाण केले आहे.

३) म. फुलेलिखित छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा हे दीर्घ काव्य मराठीतील पहिले काव्यमय शिवचरित्र आहे.

४) चरित्र, पोवाडे, कथा, कादंबरी, कविता अशा विविध साहित्य प्रकारांतून लेखन करताना छत्रपती शिवरायांप्रती असलेला लोकमनातील आदर या साहित्यातून अभिव्यक्त झाल्याचे दिसून येते.

५) अभिव्यक्तीचे माध्यम कोणतेही असले तरी छ. शिवरायांवरील प्रेम आणि आदर या साहित्यकृतीतून व्यक्त झाला आहे.

**संदर्भ-**


१) 'गर्जा महाराष्ट्र', लेखक सदानंद मोरे, प्रकाशन सकाळ पुणे पृ. क्र. २८

२) 'छ. शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा', संपादक - प्राचार्य क. दि. भगवान अनंतप्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. २

३) 'म. जोतीराव फुलेकृत छ. शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा', संपादक - डॉ. सर्जेराव जिगे तिफण प्रकाशन कन्नड, पृ. क्र. ५२

४) छत्रपती शिवाजी महाराज, (चरित्र) प्रा. हिराजी पाटील पद्मा प्रकाशन, देवपूर, पृ. क्र. ११५

५) 'महान लोककवी वामनदादा कर्डक', संपा. सूर्यकांत भगत, सुधीरप्रकाशन वर्धा, पृ. क्र. ५३

६) तत्रैव, पृ. क्र. ५३

७) 'छत्रपती शिवरायांची गीतात्मक शौर्यगाथा' कवी प्रा. आ. लिं. सोडणर, पृ. क्र. ४०

८) 'भगवं वादळ', कवी प्रभुदास बलक, प्रियविद्या प्रकाशन, पृ. क्र. ५३


◆◆◆◆◆

